जलसमृध्दी यंत्रसामुग्री (अर्थमुव्हर्स) व्याज अर्थसहाय्य योजनेकरिता सन २०१९-२० साठी लेखाशिर्ष २४०२ A२३७ अंतर्गत निधी वितरित करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः जलसं- २०१९/प्र.क्र.१२०/जल-७**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : ०३ ऑगस्ट, २०१९

**वाचा:**

१. मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र.५२२/जल-७, दिनांक २ जानेवारी, २०१८, दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८, दिनांक २१ जानेवारी, २०१९

२. मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक: जशिअ-२०१८/प्र.क्र.४००/जल-७, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ व शुद्धीपत्रक दि.९/१०/२०१८

३. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांचे क्रमांक मसविम/जलसमृद्धी/निधी मागणी/४४४/२०१९, दिनांक २० मे, २०१९ चे पत्र.

४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ०८ जुलै, २०१९.

**प्रस्तावना :**

राज्यात जलयुक्त शिवार अभियान/मृद व जलसंधारणाची कामे करण्यासाठी यंत्रसामग्री उपलब्ध करण्याकरिता सुशिक्षित बेरोजगार तरुण/ बेरोजगारांची सहकारी संस्था /नोंदणीकृत गट शेती / शेतकरी उत्पादक कंपनी /विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना शासनाकडून मृद व जलसंधारण विभाग, सहकार विभाग व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या माध्यमातून जलसमृध्दी यंत्रसामग्री (अर्थमुव्हर्स) व्याज अर्थसहाय्य योजना संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०२ जानेवारी, २०१८ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत उत्खनन यंत्रसामुग्री (अर्थमुव्हर्स) करिता शासन अनुज्ञेय असलेली व्याज परताव्याची रक्कम लाभार्थ्यांनी हफ्ता भरल्याचा पुरावा सादर करून व्याज परताव्याची मागणी शासनाकडे सादर केल्यानंतर लाभधारकाच्या बचत खात्यात शासनाद्वारे अनुज्ञेय व्याज परतावा रक्कम जमा करण्यात येते. लाभार्थांना शासनामार्फत अनुज्ञेय असलेली व्याज परतफेडीची रक्कम वेळच्या वेळी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळावर आहे. त्यानुसार महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांच्या संदर्भाधीन दिनांक २० मे, २०१९ च्या पत्रान्वये मागणीनुसार व्याजाचे हप्ते संबंधीत लाभार्थ्यांच्या बचत खात्यात अदा **करण्यासाठी आवश्यक रु. ४९०.०० लक्ष (रुपये चार कोटी नव्वद लक्ष)** निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

जलयुक्त शिवार अभियान/मृद व जलसंधारणाची कामे करण्यासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करण्याकरिता शासन निर्णय दिनांक ०२ जानेवारी, २०१८ अन्वये सुरु करण्यात आलेल्या जलसमृध्दी यंत्रसामग्री (अर्थमूव्हर्स) व्याज अर्थसहाय्य योजनेअंतर्गत राज्यातील ३१८ लाभार्थांना यंत्रसामुग्री उपलब्ध झालेली आहे. शासनामार्फत देण्यात येणा-या कमाल व्याज परतावा लक्षात घेता प्रतिमाह रु ९८३३.३३ (रुपये नऊ हजार आठशे तेहतीस) इतक्या व्याजाचा हप्त्याप्रमाणे ३१८ लाभार्थांकरिता ३१ मार्च, २०१९ अखेरचे शिल्लक व्याजाचे हफ्ते व सन २०१९-२० कालावधीतील प्रत्येकी १२ व्याजाचे हफ्ते संबंधित लाभार्थ्यांच्या बचत खात्यात अदा करण्याकरिता आवश्यक रक्कम **रु ४९०.०० लक्ष (रुपये चार कोटी नव्वद लक्ष)** निधी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२ योजनेसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून **आयुक्त (सहकार)** राहतील. सदर निधी कोषागारातून आहरीत करण्याकरिता **"सहकार आयुक्त कार्यालयातील लेखाधिकारी"** यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी ही तरतूद संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार, अटी व शर्तीनुसार खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

३ याबाबतचा खर्च **मागणी क्रमांक झेड एच-३, मुख्य लेखाशिर्ष-२४०२ (०१) (०५) उत्खनन (अर्थमुव्हर्स) यंत्रसामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना (कार्यक्रम) ३३, अर्थसहाय्य (२४०२ए२३७)** या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा.

४ लाभार्थांना वित्तीय संस्थांकडून उपलब्ध करून देण्यात येणा-या कर्जावरील शासनामार्फत अनुज्ञेय असलेली व्याज परतफेडीची रक्कम संबंधित लाभार्थ्याच्या बचत खात्यावर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांची राहील.

५ सदर वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र व जलसमृध्दी यंत्रसामग्री (अर्थमूव्हर्स) व्याज अर्थसहाय्य योजनेचा मासिक प्रगती अहवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांनी नियंत्रक अधिका-यामार्फत पुढील महीन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास सादर करण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८/०७/२०१९ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत असुन या परिपत्रकातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८०३११०७२०२९२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Suresh Dattatray Naik

Digitally signed by Suresh Dattatray Naik
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water and Soil Conservation, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=850d803882a7cf083f80e9f3e97bd648dfbbeea0f79d5c58464988f98099e530, serialNumber=842e7f01ad6007a0f84abab1d0f7812ebd23bbe62268de19a63ea2372de520a4, cn=Suresh Dattatray Naik
Date: 2019.08.03 13:09:56 +05'30'

**( सु. द. नाईक )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

(१) मा.राज्यपाल यांचे सचिव
(२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
(३) मा. सभापती/अध्यक्ष, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ,मुंबई
(३) मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई
(४) सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य (सर्व)
(५) मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
(६) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव,
(७) मा. राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
(८) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
(९) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय, मुंबई (सर्व)
(१०) विभागीय आयुक्त (सर्व)
(११) आयुक्त (सहकार), महाराष्ट्र राज्य, पुणे.
(१२) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
(१३) आयुक्त (मृद व जलसंधारण), महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद.
(१४) व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे
(१५) सर्व जिल्हाधिकारी.
(१६) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
(१७) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे
(१८) सर्व प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग.
(१९) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
(२०) सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था
(२१) सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी
(२२) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
(२३) निवड नस्ती (जल-७)